# कुटुंबांतील मुलांच्या परिव्ययाचे[१] आगणन[२]

सुलभा ब्रह्मे

कुटुंबांत निरनिराळ्या व्यक्तींसाठीं किती व्यय केला जातो आणि कांहीं व्यक्तींची भर पडल्यास त्या कुटुंबास आपलें निर्वाह-प्रमाप[३] कायम टिकविण्यासाठीं किती अधिक आय असण्याची जरुरी भासेल इत्यादि प्रश्नांना अर्थशास्त्रांतील उपभोगविषयक विवेचनांत बरेंच महत्त्व आहे. उपभोक्तृ–व्ययविषयक[४] सामग्रीचें विश्लेषण करतांना ( उदा. आय प्रत्यास्थता[५] काढणें) कुटुंबाच्या आकाराचें मापन करण्याच्या दृष्टीनें वरील माहिती आवश्यक आहे. तसेंच कुटुंबाच्या आकाराच्या मानानें आय-कर कमीअधिक करणें, कुटुंब – अभिदेय[६] देणें इत्यादिविषयीं धोरण ठरविण्यासाठीं वरील माहितीचा उपयोग होईल. परंतु या तऱ्हेची माहिती उपभोक्तृ-व्ययविषयक अधीक्षणांत[७] प्रत्यक्षत: मिळणें कठीण असतें. कारण बहुतेक उपभोगपदांवरील[८] व्यय कुटुंबासाठीं एकत्रित असा केला जातो. वस्त्र, शिक्षण अशा कांहीं विशिष्ट बाबी सोडल्यास अन्न, इंधन, निवास इत्यादि उपभोगपदांवर कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तींसाठीं किती व्यय केला जातो, हें पृथक् पृथक् सांगणें शक्य होत नाहीं. यामुळें निरनिराळ्या व्यक्तींसाठीं केल्या जाणाऱ्या व्ययाचें आगणन करावयाचें असल्यास अप्रत्यक्ष रीतीचा अवलंब करणें आवश्यक होतें.

कुटुंबांत फक्त प्रौढ व्यक्ति असल्यास, त्या कुटुंबामध्यें मुलांची भर पडल्यानंतर मुलांसाठीं अधिक किती व्यय करावा लागेल याचें आगणन करण्यासाठीं प्रा. निकल्सन्* यांनीं एक अप्रत्यक्ष रीति सुचविली आहे. विश्लेषणासाठीं त्यांनीं फक्त पतिपत्नी, पतिपत्नी व एक मूल आणि पतिपत्नी व दोन मुलें अशा तीन प्रकारचीं कुटुंबें विचारांत घेतलीं. वरील तीन प्रकारचीं कुटुंबें हीं मुलांच्या संख्येबाबत भिन्न आहेत व इतर सर्व बाबतींत समान आहेत—म्हणजेच मुलांच्या उपस्थितीचा कुटुंबाच्या आवडीनिवडी, गरजा यांवर सार्थक[९] परिणाम होत नाहीं—असें गृहीत धरलें. या तीनहि प्रकारच्या कुटुंबांचें निर्वाह – प्रमाप एकच असेल तर पतिपत्नी व एक मूल असलेल्या कुटुंबाचा व्यय फक्त पतिपत्नी असलेल्या कुटुंबाहून अधिक असेल आणि या दोन प्रकारच्या कुटुंबांतील एकूण व्ययांमधील फरक मुलांचा परिव्यय दर्शवितो असें मानितां येईल. परंतु यासाठीं निरनिराळ्या प्रकारच्या कुटुंबांचें निर्वाह–प्रमाप समान आहे ना हें प्रथम

१. परिव्यय - cost
२. आगणन - estimation
३. निर्वाह-प्रमाप - standard of living
४. उपभोक्तृ-व्यय - consumers' expenditure
५. आय प्रत्यास्थता - income elasticity
६. कुटुंब-अभिदेय - family allowance
७. अधीक्षण - survey
८. उपभोगपद - item of consumption
९. सार्थक - significant

* Nicholson, J. L., "Variations in Working Class Family Expenditure" *Journal of Royal Statistical Society, Series A* ( 1949 )